# LIN*Opinion*

**THE LINTAS PUBLIC RELATIONS DIVISION**

| | |
|---|---|
| PUBLICATION | SAKAL |
| EDITION | PUNE |
| DATE | NOVEMBER 25,2006 |
| PAGE | 3 |


Now all Tests related to the Cancer Diagnosis can be done in India



# कर्करोग निदानाच्या सर्व चाचण्या आता भारतातच शक्य

**'ऑनक्वेस्ट'द्वारे नवे तंत्रज्ञान लवकरच पुण्यातही**

सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. २४ : कर्करोग निदानात वारंवार कराव्या लागणाऱ्या विविध प्रकारच्या चाचण्यांसाठी 'डाबर'च्या 'ऑनक्वेस्ट' या संशोधन कंपनीने तंत्रज्ञान उपलब्ध करून दिले आहे. या तंत्रज्ञानाद्वारे बहुतांश प्रकारच्या चाचण्या भारतातच करणे शक्य होणार असून, यामुळे चाचणीसाठी लागणारा वेळ व खर्च यामध्ये बचत होऊ शकेल. सध्या देशातील ३० शहरांत या चाचण्या उपलब्ध असून, पुण्यासह नाशिक व नागपूर येथील रुग्णालयांमधून हे तंत्रज्ञान लवकरच उपलब्ध होत आहे.

'ऑनक्वेस्ट'चे प्रमुख विवेक त्रिखा यांनी ही माहिती दिली. कर्करोगावरील चाचण्यांसाठी होणाऱ्या खर्चात बचत करणे व त्याबाबतचे गैरसमज दूर करणे, या उद्देशाने हे तंत्रज्ञान विकसित करण्यात आले आहे. औषधाची नेमकी मात्रा ठरविण्यासाठी हे उपयोगी ठरत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ते म्हणाले, "कर्करोगाचे निदान निश्चित करताना अनेक प्रकारच्या चाचण्या कराव्या लागतात. उपचार सुरू असतानाही विविध चाचण्यांना सामोरे जावे लागते. यासाठी विविध डॉक्टर व प्रयोगशाळांशी संपर्क साधावा लागतो. 'ऑनक्वेस्ट'ने उपलब्ध केलेल्या तंत्रज्ञानामुळे रुग्णाच्या रक्ताचे नमुने एकाच ठिकाणी गोळा करण्यात येतात. हे नमुने 'ऑनक्वेस्ट'च्या नवी दिल्ली येथील प्रयोगशाळेत तपासून त्यांचे अहवाल संबंधित रुग्णालय व डॉक्टरांकडे चार दिवसांत उपलब्ध करून देणे शक्य होते."

या चाचण्यांना 'राष्ट्रीय परीक्षण आणि प्रमाणीकरण प्रयोगशाळा मंडळ' (एनएबीएल) यांची मान्यता मिळाली आहे, असे स्पष्ट करून ते म्हणाले, "चाचण्यांचे शुल्क दोनशे रुपयांपासून २० हजारांपर्यंत आहे. आतापर्यंत दहा हजारांहून अधिक रुग्णांनी या तंत्रज्ञानाद्वारे चाचण्या करून घेतल्या आहेत. भारतासह काठमांडू व कोलंबो येथील रुग्णालयांशी करार करण्यात आले आहेत."

## तंत्रज्ञानाचे फायदे

- रक्ताचे नमुने एकाच ठिकाणी गोळा करण्याची सोय
- औषधाची नेमकी मात्रा ठरविता येते
- चाचण्यांसाठीचा वेळ वाचेल
- खर्चातही मोठी बचत शक्य
- चाचण्यांचे अहवाल चारच दिवसांत मिळणार
- रुग्णांची धावपळ टळते


**DIVISION OF LINTAS INDIA PVT LTD**
1003 TOWER A, SIGNATURE TOWERS, SOUTH CITY 1, GURGAON 122 001, HARYANA
TEL 0124-5150200, FAX 0124-5150222
Registered Office : Lintas India Private Limited, Express Towers, Nariman Point, Mumbai - 400 021
Offices also at Mumbai, Bangalore, Kolkatta and Chennai